Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# मराठी लोकनाट्यातील स्त्री कलावंतांची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिती व उपाय

**प्रा. डॉ. विनोद वासुदेव उपर्वट,** कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

**प्रस्तावना**

'तमाशा' आणि 'स्त्री' या दोन्ही संकल्पना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या आहेत. तमाशा हा महाराष्ट्राचा पारंपरिक लोकनाट्य प्रकार असून तो मनोरंजनाचे प्रमुख साधन म्हणून प्रसिद्ध आहे. यामध्ये गायन, नृत्य आणि अभिनय यांचा सुंदर संगम असतो. परंतु, तमाशाच्या दुनियेत स्त्रीचे स्थान फारसे सोपे आणि सन्माननीय राहिलेले नाही.

सुरुवातीच्या काळात तमाशामध्ये स्त्रिया नव्हत्या; पुरुषच स्त्री पात्रे साकारत असत. पुढे स्त्रिया तमाशात सहभागी होऊ लागल्या आणि 'लावणी सम्राज्ञी' म्हणून प्रसिद्ध झाल्या. लावणी हा तमाशाचा मुख्य गाभा असून, त्यात स्त्रियांना प्रमुख स्थान मिळाले. असे असले तरी तमाशातील स्त्रियांना केवळ 'नर्तिका' व 'गायिका' नव्हे, तर अनेकदा 'बाई' या दृष्टीनेच पाहिले गेले. त्यांचे जीवन आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत कठीण राहिले आहे. समाजाने त्यांना नेहमीच एक वेगळे स्थान दिले – कौटुंबिक जीवनापासून वेगळे, प्रतिष्ठेपासून दूर. अनेक तमाशा कलाकारांना 'बायजाबाई', 'गणपतराव', 'मास्तर' अशा पदव्या मिळाल्या, पण तरीही त्यांची सामाजिक पत खालच्या स्तरावर ठेवली गेली.

तमाशा हा एक लोककला प्रकार असला तरी त्याला पूर्वीच्या काळी त्यांच्याकडे चांगल्या नजरेने पाहत नव्हते; खरे तर तमाशा हे मराठा भाषेचे वैशिष्ट्ये आहे.तमाशा हे मराठी मनाचे प्रतिबिंब आहे. हा अभिमान असला तरी मराठी माणसाने त्याला अश्लील माननं हेच मनाला पटत नाही. आज समाजात दोन कुटुंबात भांडणे झाली तर भांडणात सुद्धा लोक म्हणतात की, "तुम्ही दोघे भाऊ भांडणे करून दुनियेला तमाशा दाखवू नका" लोकांच्या बोलीभाषेत सुद्धा 'तमाशा' म्हणजे वाईट असं बोलल गेल आणि ते नंतर हळूहळू प्रचलित होत गेलं.

तमाशा हा शब्द मूळ पार्शियन भाषेतील दिसून येतो. मराठी साहित्यातील १२९० मधील 'ज्ञानेश्वरी' पर्यंत तमाशा हा शब्द दिसून येत नाही. 'पवाडा' असा उल्लेख आढळतो. तिथपासून पुढे संत एकनाथांच्या भारुडात 'तमाशा' हा शब्दप्रयोग येतो जसे की,

"दुनियामे बडा बडा 'तमाशा'।
बडे बडे हुनर लगे ॥"

त्यानंतर असे दिसून येते की, १९३०-५० हा शिवकाल – त्यातही तमाशा दिसत नाही, आढळून येत नाही. शिवकाळानंतर म्हणजे १७५०-१७७० या काळातील 'राम जोशी', 'अनंत फंदी' यांनी मात्र फड गाजवल्याचा इतिहास दिसतो. अठराव्या शतकात तर 'लावणी' चा जन्म झालेला दिसतो. संत नामदेव व्हटकर म्हणतात की, "१६७५ च्या सुमारास भूश्न्चे नाव ऐकल्यानंतर १७२० च्या पेशवाईच्या सुरुवातीबरोबर लावणी आणि गाण्याचे फड जे दिसतात ते मध्यंतरीच्या ३०-४० वर्षात बनत गेले.म्हणजे तमाशा मराठी भाषेबरोबर नव्हे तर मराठी राज्याबरोबर जन्माला आला." म्हणजे १७ व्या शतकाच्या शेवटी व अठराव्या शतकाच्या सुरुवातीला 'तमाशा' जन्माला आला असे म्हटले जाते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मराठी भाषेत लोकनाट्य ,तमाशा हा शब्द रूढ आहे.नामदेव व्हटकर म्हणतात की ,"लोक या शब्दाचा अर्थ साधारण वर्ग .सामान्य जन असा होतो." भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर व्याप्ती वाढली.इंग्रजीत त्याला (Folk lore) 'लोक' या शब्दाची आजही ग्रामीण भागातील गरीब,कष्टकरी शेतमजूर शेतातील कामे संपवून तमाशा बघायला जातात. जो वर्ग मोठ्या प्रमाणात जातो तो सर्वसामान्यातला असतो.म्हणून 'व्हटकर' च्या विधानात आजही तथ्य दिसते.अनेक जत्र-यात्रेत तमाशा मंडळे येवून गावकरीचे मनोरंजन करीत असतात.आजही खेड्यापाड्यात मनोरंजनाचे फारसे साधने नाहीत म्हणून मनाचा विसावा घालावा कोठे हा प्रश्नच तिथल्या शेतकरी मजुरीचा असतो म्हणून या तमाशाला लोककलेत अधिक स्थान आहे.

गण, सोंगाड्या, कृष्ण, पेंद्या, राधा, थाट असला म्हणजे 'तमाशाच' असतो. तो गावच्या चौकात,पाराशेजारी आणि आताच्या आधुनिक काळात गावाबाहेर टेंट टाकून अत्याधुनिक लाईटने उभा केलेला डोलारा म्हणजे 'तमाशा' लोकप्रबोधनाचे माध्यम म्हणून 'लोकनाट्य' हा महाराष्ट्राचा लोककलाप्रकार महत्वाचा आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. यापूर्वी 'तमाशा' या लोकप्रिय कला प्रकारावर जेव्हा बंदी लादली तेव्हा लोकशाहीर अण्णाभाऊ साठेनी 'लोकनाट्य' हा शब्दप्रयोग करून तमाशाचे नामकरण आधुनिकतेत केले व तमाशाला न्याय मिळवून दिला. सतराव्या शतकातील तमाशा 'खडी गम्मत' म्हणून ओळखला जातो. प्रसिद्ध होता. नामचंद पवळा ही तमाशातील पहिली स्त्री मुळात एक मुरळी होती. तमाशात रूढ अर्थाने स्त्री पात्राला अधिक महत्त्व होते. आजही ग्रामीण भागातील यात्रेमध्ये लोकनाट्याचे फड आवर्जून असतात. लोकही त्याला साथ देतात.

**लोकनाट्याची संकल्पना**

१. पारंपारिक तमाशाच्या अनुकरणातून १९ व्या शतकामध्ये समाजजागृती, समाजप्रबोधन, पक्षीय प्रचार इत्यादी विविध उद्देशाने काही नाट्यरूपांची आणि वगाची निर्मिती झालेली दिसते. अशा नाट्य रुपाला लोकनाट्य अशी संज्ञा प्रचलित असल्याचे दिसते.
२. "सामान्य माणसांची ही असामान्य होती कारण ती बंदिस्त नव्हती. तमाशा म्हणजे मुक्तनाट्य"[८] असे गंगाधर पानतावणे म्हणतात.

चंद्रकांत ढवळपुरीकर हे गोंधळी समाजात जन्माला आले. त्यांच्या 'संत तुकाराम' या धार्मिक वगाने संपूर्ण महाराष्ट्रात व परप्रांतात त्यांनी प्रसिद्धी मिळवली. 'रक्ताची रक्ताला फाशी', 'काय दिले या स्वातंत्र्याने', 'बापच झाला अतिरेकी', 'करा ढार हे गंगवार,' ज्ञानेश्वर माझी माऊली', 'भक्त पुंडलिक' यासारख्या अनेक वगानी महाराष्ट्रावर साम्राज्य गाजविले.

भिका-भीमा सांगवीकर लोकनाट्य उभ्या महाराष्ट्राला परिचित आहे. 'डाकू संग्रामसिंग', 'वेडा झालो तुझ्यासाठी', 'संघर्ष पेटला पापाचा', हे वग प्रसिद्ध आहेत.

तमाशा हा गायन, वादन, नृत्य आणि विनोद यांनी युक्त असलेला लोकनाट्याचा एक अविष्कार आहे. तमाशा हा शब्द मूळ अरबी असून त्याचा अर्थ 'दृश्य खेळ' व 'नाट्यप्रयोग' असा आहे. गण म्हणजे गणपतीला केलेले आवाहन. तमाशाचा खेळ निर्विघ्न पार पडावा म्हणून तमाशाचा सरदार म्हणजे मालक हे आव्हान करतो. गौळण गण संपल्यावर काही काळ ढोलकी व कडे यांचे वादन होते. ढोलक्याची पुरेशी अंगात भिनल्यावर तमाशातील नृत्य होते आणि मग गौळण-गौळणीचा विषय असतो. श्रीकृष्णाच्या गोकुळ लीला नर्तकी या गोपी होतात आणि त्यांच्यामध्ये वयस्कर असणारी मावशी असते. या गोपी मथुरेला दुध, लोणी, दही वगैरे घेवून जात असतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

मंचावर जर दोन फडांचे तमासगीर एकाच वेळी असतील तर त्यांच्यातील सरसनिरस ठरवण्यासाठी त्यांच्यामध्ये आपआपसात सवाल-जबाब होतात. बहुधा पौराणिक कथावर आधारलेली कुटप्रश्न एकमेकांना काव्यातून विचारून त्यांची उत्तरे ओळखण्याचा हा कार्यक्रम असतो. मंचावर होणारे शृंगारिक लावण्याचे सादरीकरण म्हणजे रंगबाजी. मंचावर एकापेक्षा अधिक फडांचे तमासगीर असतील तर त्या रंगबाजीला 'संगीतबारी' म्हणतात.

वग म्हणजे नाट्यरूपाने सादर केलेली कथा, या कथा पौराणिक, ऐतिहासिक किंवा लोककथा असतात. या कथांमधील संवाद लिखित नसून पात्रांनी ते केवळ स्वताच्या बुद्धीने म्हणायचे असतात. "महाराष्ट्रातील उल्लेखनीय तमासगीर आणि त्यांचे फड. 'काळू बाळू', 'पठ्ठे बापूराव', 'राम जोशी', विठाबाई', 'भाऊ मांग नारायणगावकर', 'विठ्ठल उमप', 'होनाजी बाला' विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर लोकनाट्य तमाशा मंडळ, मालती इनामदार लोकनाट्य तमाशा मंडळ, 'काळू बाळू' लोकनाट्य तमाशा मंडळ, रघुवीर खेडकरसह कांताबाई सातारकर लोकनाट्य तमाशा फड, हरिभाऊ बढे नगरकर लोकनाट्य तमाशा मंडळ, तमाशा सम्राट शिवराम बोरगावकर लोकनाट्य तमाशा मंडळ, भिका-भीमा लोकनाट्य तमाशा मंडळ, दत्ता महाडिक लोकनाट्य तमाशा मंडळ, पांडुरंग मुले यांच्यासह अविष्कारमुळे मांजरवाडीकर लोकनाट्य, आनंद लोकनाट्य तमाशा मंडळ इत्यादी.

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे. लावणी कित्तेकदा तमाशाचा हिस्सा म्हणूनही सादर करतात. लावणीचे मुख्य ३ प्रकार पडतात.

१. नृत्यप्रधान लावणी,
२. गाणंप्रधान लावणी,
३. अदाकारी प्रधान लावणी,

लोकनाट्यात लावणीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकनाट्याची बैठक ही धार्मिक बैठकीवर उभी आहे. शहरी आणि नागरी भागातही देवतोपासनेचा भाग म्हणून लोकनाट्याचे प्रयोग होताना दिसतात. आता मात्र तमाशा म्हणजे लोकनाटयाचा हेतू अगदी पूर्णपणे मनोरंजन हाच आहे. असे दिसून येते. लोकनाट्याचे स्वरूप अभ्यासताना असे दिसते की, लौकिक लोकानुभवांचा हा अविष्कार खऱ्या अर्थाने त्यांचे लोकनाट्यत्व सिद्ध करते.

तमाशात पूर्वी पुरुषच 'स्त्रीपात्र' करीत असत. स्त्रीश्रुंगार करून उत्तम अभिनयाद्वारे स्त्री पात्राद्वारे तमाशा उत्तम रात्रभर चाले. तमाशात स्त्रीचा प्रवेश झाल्याने तमाशाला अधिक लोकप्रियता मिळाली होती. फडमालक म्हणून यमुना वाईकर, कौशल्या कोपरगावकर, सत्यभामा पंढरपुरकर अशा स्त्रिया देखील पुढे आल्या. (तमाशा या कलेला लोकनाट्याची प्रतिष्ठा मिळवून देण्याचे श्रेय अण्णाभाऊ साठेना जाते. म्हणून त्यांना 'लोकनाट्याचे जनक' असेही म्हणतात.

लोकनाट्यामध्ये अर्थात तमाशाप्रमाणे गण,गौळण,लावणी,बतावणी याला अधिक महत्त्व असते आहे.म्हणून हा कलाप्रकार यात्रा (जत्रा) मध्ये ग्रामीण भागात मनोरंजन व प्रभोध्राचा मार्ग म्हणून लोकप्रिय झाला.लोकनाट्य (तमाशा) पेशवाईत सिद्ध झाला असे म्हणतात. "प्रसिध्द कलगी पक्षाचा शाहीर हैबती पायात घुंगरू बांधून नाचत होता अशी माहिती मिळते. हा उल्लेख नंतरच्या पेशवेकाळातील असले तरी भेदिक फडाचे स्वरूप स्पष्ट करणारे आहेत." पेशवेकालीन तमाशाला 'नाच्या पोऱ्याचा तमाशा' असे म्हटले जाते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

अर्थात तमाशात सुरुवातीला 'स्त्रीपात्र' नव्हती म्हणून परुष स्त्रीपात्र करायचे. नंतर अश्लिलतेच्या नावावर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ ला सुरुवातीला बाळासाहेब खेर मंत्री असताना मोरारजीभाई देसाई यांनी तमाशावर अश्लिलतेचा आरोप करून बंदी आणली.[६] पुढे तमाशात बदल करण्यात आला. तमाशाने चित्रपट आधुनिकतेची कास धरायला सुरुवात केली. लोकनाट्यात गण म्हणजे विघ्नहर्ता गणपतीची आरती प्रारंभी गायली जाते. उदा.

श्री. वक्रतुंड गणपती ।
गणाधिपती तुझी जे स्तिती ॥

त्यानंतर गौळण येते म्हणजे कृष्ण, त्याचा सवंगडी, राधा आणि मावशी असा हा थाट मथुरेच्या बाजाराला निघालेला....त्यात 'मावशी'ची भूमिका महत्वाची असते. त्यानंतर 'लावणी' सादर केली जाते. लोकनाट्यातही शाहिरी लावणी, बैठकीची लावणी, फडाची लावणीचे सादरीकरण केल्या जाते. त्यानंतर बतावणीला अधिक महत्त्व असते. बतावणी एक विनोदी कथा असते. त्यातून विनोद निर्मिती घडवून आणली जाते आणि शेवटी 'वग' सादर केला जातो. 'वग' हा अधिक नाट्यपूर्ण आणि लोकप्रिय घटक आहे. अर्थात वग तमाशाच्या म्हणजे लोकनाट्याच्या शेवटी केला जातो. तो नाटकासारखा भाग असतो. १८५०-१८६० च्या दरम्यान उमा बाबू यांनी 'मोहना बटाऊ' नावाचा वग लिहिला.

मंगला बनसोडे या प्रसिद्ध लावणी सम्राज्ञी विठाबाईची मुलगी. वग रचनाकार रमेश बनसोडे यांच्यासोबत त्यांचा विवाह झाला. व नंतर त्यांनी स्वतंत्र असा थाटामाटाचा तमाशा फड उभा केला. मंगला बनसोडे लोकनाट्य हे आजही प्रेक्षकांच्या हृदयात ठाण मांडून आहे. अक्काबाई कराडकर लोकनाट्य : कोल्हाटी समाजातील अक्काताईनी स्वताचा फड उभा केला. अक्काबाई कराडकर लोकनाट्य हा संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. कुंदा पाटील पिंपळीकर यांनीही स्वताचा स्वतंत्र तमाशा फड उभा केला आहे. 'तमाशाचा वारसा' त्यांना आपल्या वडिलापासून मिळाला आहे.

सौ.उषा पाटील खोमणे औरंगाबादकर लोकनाट्य या नाट्याने सामाजिक परिवर्तनाचा विडा उचललेला दिसतो. कांताबाई सातारकर याही नावाने त्या परिचित आहेत. एकेकाळी तुकाराम खेडकर आणि कांताबाई यांच्या जोडीने तमाशाला नवा आयाम दिला.पुणे जिल्ह्यातील ' नारायणगाव ' हे तमाशाची पंढरी समजली जाते. दरवर्षी लोक 'नारायणगाव' येथे जावून तुकाराम खेडकराना अभिवादन करतात. तमाशा कलावंत म्हणून प्रत्येक जण तिथे हजेरी लावतात. आजही 'तमाशा महोत्सव' साजरा केला जातो. त्या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. त्या उत्तम गायक आहेत.

तमाशा सम्राज्ञी विठाबाई या अद्वितीय कलागुणासह तमाम तमाशा रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या तमाशा सम्राज्ञी होत्या. त्यांचा जन्म १९३५ साली जुलै महिन्यात पंढरपूर येथे झाला. विठाबाईना नृत्याची आवड होती. त्यांच्या बहिणी रमाबाई व केशरबाई यांच्या मार्गदर्शनाखाली विठाबाई लावणी नृत्य करण्यात तयार झाल्या. आळतेकर, मामा वरेकर यांच्या कलापथकात विठाबाई प्रथम नोकरी करत होत्या. तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या कन्या मंगलाताई यांचा तमाशा पाहण्यासाठी लोक मोठ्या संख्येने बीड जिल्ह्यातील देवदहिफळ येथे आवर्जून येतात.

"विठाबाईच्या जीवनावर ओम भूतकर यांनी 'विठा' हे संगीत नाटक लिहिले आहे." नाटकाचे संगीत आणि दिग्दर्शन शंतनू घुले यांचे असून व्यावसायिक रंगमंचावर हे नाटक हिंदुस्थान थीएटर कंपनी करते. विठाबाईना १९५७ आणि १९९० मध्ये भारताच्या राष्ट्रपतीच्या हस्ते पदके मिळाली होती. विठाबाईना


Copyright © | JET Network, All Rights Reserved

संगीत नाटक अकादमीचा पुरस्कारही मिळाला होता. कलावंत स्त्री असो या पुरुष तो आपल्या कलेसाठी सर्वोतपरी झटत असतो. विठाबाईच्या नावाने महाराष्ट्र सरकार एक जीवनगौरव पुरस्कार देते. १५ जानेवारी २००२ मध्ये त्यांचे निधन झाले.

**निष्कर्ष**

तमाशातील स्त्रियांनी लोकनाट्याच्या जतन आणि संवर्धनासाठी मोठे योगदान दिले आहे. सोंगाड्या, नर्तिका, गवळण गाणाऱ्या स्त्रिया यांनी तमाशाला समृद्ध केले. सत्यभामाबाई पवार, वसंताबाई नार, कांताबाई सातारकर अशा अनेक कलाकारांनी तमाशाला प्रतिष्ठा मिळवून दिली. तमाशा आणि स्त्री यांचे नाते हे गोंधळलेले आहे. जरी तमाशामुळे स्त्रियांना एक व्यासपीठ मिळाले, तरी त्यांचे शोषणही मोठ्या प्रमाणात झाले आहे. समाजाने तमाशाकडे केवळ करमणुकीच्या दृष्टिकोनातून पाहण्याऐवजी, त्यातील स्त्रियांच्या संघर्षाची आणि त्यांच्या कलात्मक योगदानाची योग्य दखल घ्यायला हवी.

**संदर्भ ग्रंथ**

१. शिंदे विश्वनाथ, पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य, प्रतिमा प्रकाशन ,पुणे
२. मराठीचे लोकनाट्य तमाशा, कला आणि साहित्य, यशश्री प्रकाशन, कोल्हापूर १९७५
३. लोकनाट्याची परंपरा, ढोकळ प्रकाशन,पुणे-१९६१
४. रमेश वरखेडे (संपादक), तमाशाचा मराठी नाटकावरील परिणाम –लोकसाहित्य, लोकपरंपरा
५. ढेरे रा.चि., लोकसंस्कृतीचे उपासक, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७१
६. जोशी वि. कृ., लोकसंस्कृतीचे उपासक, विश्वकर्मा साहित्य, पुणे, १९७१
७. व्यवहारे शरद, लोकधर्मी नाट्याची जडणघडण, विश्वभारती प्रकाशन, नागपूर
८. अचलखांब रुस्तम, 'तमाशा', अनुष्टुभ, जुलै-ऑगष्ट - १९४७
९. भोर्जे गंगाधर, मराठी लावणी वाग्मय, मोघे प्रकाशन, कोल्हापूर - १९७४
१०. व्हटकर नामदेव, शेट्ये चंद्रकांत, मराठीची लोककला- तमाशा, अतुल प्रकाशन मंदिर, कोल्हापूर
११. अचलखांब रुस्तुम, 'तमाशा लोकरंगभूमी', सुगावा प्रकाशन, पुणे
१२. दै.दिव्य मराठी ,धुळे आवृत्ती, १५ जानेवारी, २०२०
१३. मराठी विकिपीडिया - दि. ८/८/२०१९


Copyright © | JET Network, All Rights Reserved